ePaper


**पुढील 7 दिवस धोक्याचे, 15 राज्यांना अतिमुसळधार पावसाचा हाय अलर्ट!**

| वर्ष - 8 | अंक - 328 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत

- माझा आवडता पत्रकार कुठेय?
- आम्ही त्याच चूका करत नाही
- चंद्रचूड यांना निवासस्थान सुटेना
- डोनाल्ड ट्रम्प यांनी सरकारमधून काढलं


www.mahaenews.com | सोमवार, दि. 7 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## कृषी क्षेत्रात दरवर्षी 5 हजार कोटींची गुंतवणूक

# शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; 'कृषी पंढरी' प्रदर्शनात घोषणा

| पंढरपूर | प्रतिनिधी | महाईन्यूज

**शेती फायदेशीर करण्यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. येत्या पाच वर्षांत दरवर्षी ५ हजार कोटी, अशा एकूण २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक कृषी क्षेत्रात करण्यात येणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली.**



'कृषी पंढरी' प्रदर्शनात मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत आयोजित 'कृषी पंढरी' या कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना फडणवीस बोलत होते. यावेळी कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजित मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजित पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी मान्यवर उपस्थित होते.

### कृषी क्षेत्रात मोठी गुंतवणूक

"ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी गोष्टींसाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जाणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढेलच, शिवाय त्यांचा फायदा देखील वाढेल," असे मुख्यमंत्री म्हणाले.



- **5 वर्षांत कृषी क्षेत्रात 25 हजार कोटींची गुंतवणूक**
- **ठिबक सिंचन, शेततळे, यांत्रिकीकरणाला प्राधान्य**
- **550 कोटींच्या वर उलाढाल असलेली बाजार समिती**
- **निर्मल वारीमुळे महिलांच्या सहभागात लक्षणीय वाढ**
- **कृषी आणि वारी यांचा सुंदर संगम**

वारकरी आणि शेतकरी एकाच प्रवाहातील - कृषिमंत्री कोकाटे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले, "वारकरी आणि शेतकरी हे वारीच्या दोन बाजू आहेत.

वारीत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीत येणाऱ्या नव्या तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरेल."

### बाजार समितीचा वेगवान विकास

प्रशांत परिचारक यांनी प्रास्ताविकात सांगितले, "ही बाजार समिती राज्यातील एक आघाडीची बाजार समिती आहे. ५५० कोटी रुपयांहून अधिक उलाढाल या बाजार समितीच्या माध्यमातून केली जाते."

### 'निर्मल वारी'मुळे स्वच्छता आणि महिलांची सोय

पंढरपूर पंचायत समिती आवारात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' या उपक्रमांचा समारोप करण्यात आला. यावेळी जयकुमार गोरे, जयकुमार रावल, पंकज भोयर, रुपाली चाकणकर, धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

"२०१८ पासून निर्मल वारीची संकल्पना सुरू केली. वारी दरम्यान महिलांसाठी स्वच्छतागृहांची योग्य व्यवस्था केल्यामुळे त्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आपली वारी आता स्वच्छ, निर्मल झाली आहे," असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# ज्येष्ठ कलाकार मानधन सन्मान योजना!

## पुणे जिल्हा परिषदेचा सांस्कृतिक कार्य संचालनालयाशी पत्रव्यवहार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकार मानधन सन्मान योजनेत दर वर्षी पाचशे जणांना मंजुरी देण्याचे उद्दिष्ट करण्यात यावे, अशी मागणी पुणे जिल्हा परिषदेने राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे केली आहे. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांसाठी वार्षिक उत्पन्नाची अट ६० हजार रुपयांवरून वाढवून ती एक लाख रुपये करण्यात यावी, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.**




पुणे जिल्ह्यामध्ये दोन महापालिका, १७ नगर परिषदा, तीन कटक मंडळे आणि १३८७ ग्रामपंचायतींचा समावेश असून, २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ९४ लाख २९ हजार ४०८ इतकी आहे. वाढीव लोकसंख्येचा विचार करता दर वर्षी शंभर इतक्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांना मंजुरी देण्याचे उद्दिष्ट आहे. नागरी भागात नागरिकांच्या स्थलांतरामुळे जिल्ह्याची लोकसंख्या एक कोटीहून अधिक झाली आहे. वाढीव लोकसंख्येचा विचार करता मानधन सन्मान योजनेतील लाभार्थी मंजुरीचे उद्दिष्ट दर वर्षी किमान पाचशे करून मिळावे, अशी मागणी करणारे पत्र पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी यांनी राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाला पाठविले आहे.दरम्यान, मानधन सन्मान योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या वृद्ध कलाकारांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी येणाऱ्या अडचणींसंदर्भात राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने भूषण जोशी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. या संदर्भात वृद्ध कलावंत मानधन समितीचे सदस्य कौस्तुभ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बालगंधर्व रंगमंदिर येथे शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यामध्ये दोन महापालिका असून, लोकसंख्येनुसार ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या शंभर ही तुटपुंजी आहे. ती वाढवून ५०० करण्यात यावी. त्याचप्रमाणे वार्षिक उत्पन्नाची अट सध्या ६० हजार रुपये आहे. ते किमान एक लाख रुपये करण्यात यावे.

पुणे जिल्ह्यामध्ये दोन महापालिका, १७ नगर परिषदा, तीन कटक मंडळे आणि १३८७ ग्रामपंचायतींचा समावेश असून, २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ९४ लाख २९ हजार ४०८ इतकी आहे. वाढीव लोकसंख्येचा विचार करता दर वर्षी शंभर इतक्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांना मंजुरी देण्याचे उद्दिष्ट आहे. नागरी भागात नागरिकांच्या स्थलांतरामुळे जिल्ह्याची लोकसंख्या एक कोटीहून अधिक झाली आहे. वाढीव लोकसंख्येचा विचार करता मानधन सन्मान योजनेतील लाभार्थी मंजुरीचे उद्दिष्ट दर वर्षी किमान पाचशे करून मिळावे, अशी मागणी करणारे पत्र पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी यांनी राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाला पाठविले आहे.

### योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या शंभर

दरम्यान, मानधन सन्मान योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या वृद्ध कलाकारांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी येणाऱ्या अडचणींसंदर्भात राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने भूषण जोशी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. या संदर्भात वृद्ध कलावंत मानधन समितीचे सदस्य कौस्तुभ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बालगंधर्व रंगमंदिर येथे शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.पुणे जिल्ह्यामध्ये दोन महापालिका असून, लोकसंख्येनुसार ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या शंभर ही तुटपुंजी आहे.

# आई माता मंदिर परिसरात अवजड वाहनांना मज्जाव

## पुणे महापालिकेकडून उंच अडथळे बसविण्यास सुरुवात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गंगाधाम चौकाजवळील आई माता मंदिराजवळील परिसरात अवजड वाहनांच्या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी अखेर अडथळे उभारण्यास सुरुवात केली. स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.गंगाधाम चौकात ११ जून रोजी झालेल्या अपघाताच्या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला.**




गेल्या वर्षी १२ जून रोजी याच ठिकाणी उतारावरून भरधाव येणाऱ्या डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे नागरिकांकडून अवजड वाहनांना मज्जाव करणारे अडथळे बसविण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत होती. रास्ता रोको आंदोलनही त्यासाठी करण्यात आले होते. महानगरपालिकेने वाहतूक पोलिसांच्या परवानगीनुसार अखेर कान्हा हॉटेल आणि आई माता मंदिर चौकाजवळ उंच आणि अवजड वाहनांना मज्जाव करणारे अडथळे बसविण्यास सुरुवात केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी वाहतूक पोलीस, रस्ते विभागाचे अधिकारी उपस्थित होते.अडथळे बसविताना सामान्य नागरिकांच्या वाहनांची वाहतूक अबाधित राहील, याची दक्षता घेण्याबाबत अमितेश कुमार यांनी सूचना केल्या, तर वाहनांचा वेग कमी करण्यासाठी ‘रंबल स्ट्रिप्स’ही रस्त्यावर लावण्याच्या सूचना या वेळी करण्यात आल्या आहेत.‘

गेल्या अनेक महिन्यांपासून आम्ही या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत होतो. महापालिकेला आणि वाहतूक पोलिसांना वारंवार निवेदने दिली, आंदोलने केली. अखेर अडथळे बसविण्यास सुरुवात झाली आहे. नक्कीच अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे थांबणार असून, स्थानिकांना दिलासा मिळाला आहे,’ अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पर्वती विधानसभा अध्यक्ष संतोष नांगरे यांनी व्यक्त केली.गेल्या वर्षी १२ जून रोजी याच ठिकाणी उतारावरून भरधाव येणाऱ्या डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे नागरिकांकडून अवजड वाहनांना मज्जाव करणारे अडथळे बसविण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत होती. रास्ता रोको आंदोलनही त्यासाठी करण्यात आले होते. महानगरपालिकेने वाहतूक पोलिसांच्या परवानगीनुसार अखेर कान्हा हॉटेल आणि आई माता मंदिर चौकाजवळ उंच आणि अवजड वाहनांना मज्जाव करणारे अडथळे बसविण्यास सुरुवात केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी वाहतूक पोलीस, रस्ते विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### नागरिकांच्या पाठपुराव्याला यश

अडथळे बसविताना सामान्य नागरिकांच्या वाहनांची वाहतूक अबाधित राहील, याची दक्षता घेण्याबाबत अमितेश कुमार यांनी सूचना केल्या, तर वाहनांचा वेग कमी करण्यासाठी ‘रंबल स्ट्रिप्स’ही रस्त्यावर लावण्याच्या सूचना या वेळी करण्यात आल्या आहेत.‘गेल्या अनेक महिन्यांपासून आम्ही या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत होतो.

### एलबीटी विभाग सुरु करण्यासाठी नगरविकास विभागाला पत्र

# एलबीटीचे भूत पुन्हा उद्योजकांच्या मानगुटीवर!

## एलबीटी विभाग बंद झाल्याने हजारो कोटींच्या महसूलावर पाणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील उद्योजक, व्यापा-यांकडे स्थानिक संस्था कर (एलबीटी) 3 हजार 383 कोटी रूपयांचा थकीत कर वसुलीसाठी प्रयत्न करत असतानाच एलबीटी विभाग 30 एप्रिलपासून बंद करण्याचे आदेश शासनाने दिले. त्यामुळे 3 हजार 383 कोटींचा कर, त्यावरील व्याज आणि दंड मिळून महापालिकेला सुमारे 7 हजार 850 कोटी रूपयांच्या महसूलावर पाणी फिरवावे लागले आहे. बंद केलेला एलबीटी विभाग सुरू ठेवावा, व्यापा-यांसाठी अभय योजना लागू करावी, मागणी महापालिकेने शासनाच्या नगरविकास विभागाकडे पत्राव्दारे केली. मात्र, शासनाने कोणतेही उत्तर दिले नाही.**




पिंपरी-चिंचवड तत्कालीन राज्य सरकारने जकात बंद करून 1 एप्रिल 2013 रोजी एलबीटी लागू केला. या कराची 30 जानेवारी 2017 पर्यंत अंमलबजावणी सुरू होती. मात्र,या कराला राज्यासह शहरातील व्यापा-यांनी कडाडून विरोध केला. त्यामुळे शासनाने 1 जुलै 2017 पासून एलबीटी कर रद्द केला. दरम्यान, एलबीटी कर रद्द झाल्याने अनेक उद्योजक, व्यापा-यांनी थकबाकी भरली नाही. त्यामुळे महापालिकेने नोंदणी केलेल्या ज्या उद्योजक, व्यापा-यांनी एलबीटीची भरलेली रक्कम योग्य आहे की नाही, याच्या तपासणी केली. त्यासाठी 2020 पासून उद्योजक आणि व्यापा-यांना नोटीसा दिल्या. एलबीटीसाठी नोंदणी केलेल्या नोंदणी केलेल्या उद्योजक, छोटे-मोठ्या अशा 72 हजार व्यापा-यांना नोटिसा दिल्या. तसेच ज्या व्यापा-यांनी कागदपत्रे जमा केली नाहीत, अशा व्यापा-यांची माहिती विक्रीकर विभागाकडून महापालिकेने घेतली. त्यांना एलबीटी कराची आकारणी केली. एलबीटीच्या सर्व प्रकरणाचा निपटारा सुरू असतानाच हा विभाग बंद करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने 30 एप्रिल 2025 एलबीटी विभाग कायमचा बंद करण्याची सूचना केली. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठविले. उद्योजक, व्यापा-यांकडे स्थानिक संस्था कर (एलबीटी) 3 हजार 383 कोटी रूपयांचा थकीत कर त्यावरील व्याज आणि दंड मिळून महापालिकेला सुमारे 7 हजार 850 कोटी रूपयांचा महसूल मिळेल, अशी अपेक्षा होती. त्यानुसार 2025-26 या महापालिकेच्या अर्थसंकल्पात एलबीटी विभागातून तब्बल 200 कोटी रूपये मिळतील, असा उल्लेख केला होता.

मात्र, शासनाने एलबीटी विभाग केला. त्यानंतर आयुक्त सिंह यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठवून एलबीटी विभाग सुरू ठेवावा. व्यापा-यांसाठी अभय योजना लागू करावी, अशी मागणी केली. मात्र, शासनाने कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे महापालिकेतील एलबीटी विभागाचे कामकाज पूर्णपणे थांबले असून 7 हजार 850 कोटींच्या महसूलावर पाणी फेरावे लागले आहे.

> “ महापालिकेच्या एलबीटी विभागामध्ये 48 हजार 822 प्रकरणातील कर निर्धारणाचे कामकाज पूर्ण झाले आहे. यामधून महापालिकेला 3 हजार 383 कोटी रूपयांचा थकीत कर त्यावरील व्याज आणि दंड मिळून 7 हजार 850 कोटी रूपयांचा महसूल मिळेल, अशी अपेक्षा होती. शासनाने एलबीटी विभाग बंद करण्याचे आदेश दिले. मात्र, हा विभाग सुरू ठेवण्याबाबत राज्य सरकारकडे पत्रव्यवहार करण्यात आला. त्याला शासनाकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे विभागाचे कामकाज पूर्णपणे थांबले आहे.
>
> **- सीताराम बहूरे,** उपायुक्त, महापालिका.

---

### पिंपरी-चिंचवडच्या पाण्याची चिंता मिटली

## पवना धरण 75 टक्के भरले, पाणी पातळीत वाढ झाल्याने विसर्ग सुरु

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**- धरणाच्या सांडव्यावरून 400 क्यूसेक्स पाणी नदीपात्रात सोडले**



**पिंपरी चिंचवड: मावळसह पिंपरी-चिंचवड शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे पवना धरण सततच्या पावसामुळे रविवारी 75 टक्के भरले आहे. पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाणीपातळीत दिवसेंदिवस वेगाने वाढ होत आहे. त्यातून पूरपरिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून धरणाच्या सांडव्यातून ४०० क्युसेक्सने पवना नदीच्या पात्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे.**

यावर्षी अपेक्षेपेक्षा अधिक पाऊस झाल्याने पाणीसाठा वेगाने वाढत आहे.

धरणात शहराला वर्षभर पुरेल इतके पाणी जमा झाल्याने शहरवासीयांच्या पाण्याची चिंता मिटली आहे. पाणलोट क्षेत्रात गेल्या २४ तासांत ३३ मिमी पावसाची नोंद झाली.

त्यामुळे खबरदारी म्हणून ४०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात आला आहे. १ जूनपासून धरण परिसरात १०८५ मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद आहे.’

> “ पवना धरण 75 टक्के भरले असून पाण्याची चिंता मिटली आहे. धरणातून सांडव्याद्वारे ४०० क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू राहिल. पुढील काळात पाऊस वाढल्यास धरणात होणाऱ्या साठ्यानुसार पाण्याचा विसर्ग साठ्यानुसार केला जाईल. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे.
>
> **-रजनीश बारिया,**
> शाखाअभियंता, पवना पाटबंधारे विभाग, पवना धरण

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



'स्टेट'मेंन्ट

राहुल जगताप

सर्व साधनांत श्रेष्ठ साधन नामस्मरणच आहे. पण त्याचे महत्त्व कळत नाही. ते कळायला खरोखर भगवत्कृपाच पाहिजे. आपल्या शरीरात मुख्य जसे हृदय, आणि बाकीचे अवयव गौण आहेत, तसे परमार्थात मुख्य साधन नामस्मरण हे आहे आणि दुसरी साधने गौण आहेत. नाम हे मंगलांत मंगल आणि अत्यंत पवित्र आहे. आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे हे पक्के लक्षात ठेवा. योगात, योग करीपर्यंतच समाधान असते; पण नामस्मरणाच्या अनुसंधानात सतत समाधान असते. स्वत: निर्गुण झाल्याशिवाय निर्गुण उपासना होत नाही. तेज दिसणे, नाद ऐकणे, या सर्व गोष्टी गुणातच नाही का आल्या ? निर्गुण व्हायला देहबुद्धी सुटायला पाहिजे. सर्वव्यापी परमेश्वराला सर्वांभूतीं पाहणे ही निर्गुण उपासनाच होय. योग नामस्मरणाला पोषक तितकाच करावा; केवळ त्यालाच प्राधान्य देऊ नये. योग नामस्मरणाला पोषक आहे, पण नामस्मरण योगाच्या पलीकडे आहे; म्हणून नामस्मरणात योग येतो, योगात नामस्मरण येत नाही. सर्व साधनांचा अंत नामस्मरणात आहे. नामाचे साधन हे जलद गाडीप्रमाणे आहे. रंग दिसणे, प्रकाश दिसणे, आवाज ऐकू येणे ही मधली स्टेशने सोडून नाम एकदम भगवंतापर्यंत नेऊन पोहोचवते. इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल, पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल, पण जे साधेल ते कायमचे साधेल, कारण नामाने मुळापासून सुधारणा होते. नामस्मरण हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग होय. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वत:ला विसरेल. तुकारामबुवांची वाचा त्यांना अनावर झाली, ती सारखी नाम घेऊ लागली; याचा अर्थ असा की, त्यांच्या कल्पनेच्या बाहेर नाम येऊ लागले. गाडी उताराला लागली की जशी अतिवेगात येते आणि आवरत नाही, तसे हे आहे. आपल्या शक्तीच्या बाहेर कार्य होणे ही भगवंताची कृपा होय.

चार माणसे होती, त्या सर्वांना एकच रोग झाला होता. पण त्यांची सांपत्तिक स्थिती सारखी नव्हती. वैद्याने त्यांपैकी अगदी गरीब माणसाला एक औषध तुळशीच्या रसात घ्यायला सांगितले, त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध मधात घ्यायला सांगितले, त्याच्याहीपेक्षा पैसेवाल्याला तेच औषध केशरात घ्यायला सांगितले, आणि सर्वांत श्रीमंत होता त्याला तेच औषध कस्तुरीत घ्यायला सांगितले. त्याचप्रमाणे, ज्याचा जसा अधिकार तसे त्याने नाम घ्यावे. नाम नुसते तोंडाने घ्यावे, नाम श्रद्धेने घ्यावे, नाम वृत्ती सांभाळून घ्यावे, नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही, अशा दृढ भावनेने घ्यावे; सर्वांना फळ सारखेच मिळेल.

# चोहोबाजूंनी सुरू आहे पडझड, काँग्रेसची केविलवाणी धडपड!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष म्हणजे 'महायुती' मधील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस, तर 'महाआघाडी' तील उबाठा गट आणि शरद पवार गट हे निवडणुकीची तयारी करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना बरोबर घेण्याची खेळी खेळली आहे. तिकडे 'महायुती' भक्कम आहे. पण, महाआघाडीतील काँग्रेस पक्षाची अवस्था मात्र 'ना घर का, ना घाट का..' अशी झाली आहे. सगळीकडून पडझड सुरू आहे, तर अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांची केविलवाणी धडपड सुरू आहे.**

### जुना जीर्ण वाडा.. बुरुज ढासळले!

भारताच्या राजकारणात काँग्रेस हा सर्वात जुना पक्ष आहे. पूर्वी, वर्षानुवर्षे त्यांनी संपूर्ण भारतावर अबाधित सत्ता मिळवून कारभार केला. पण, गेल्या दहा पंधरा वर्षात भारतीय जनता पार्टीने वेगवेगळ्या क्लूप्त्या लढून काँग्रेसला जेरीस आणले आहे. केंद्रात त्यांचा कसाबसा विरोधी पक्ष नेता झाला, तर महाराष्ट्रात महाआघाडीचा मिळून विरोधी पक्षनेता होऊ शकत नाही अशी अवस्था विरोधकांची झाली आहे.

### काँग्रेसचे 'आऊटगोईंग' सुरू..

सध्या देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील 'महायुती' एवढी बळकट आहे, की विरोधी पक्षांच्या नेत्यांची प्रचंड गोची झाली आहे आणि 'महायुती' मधील एका घटक पक्षात प्रवेश करण्याशिवाय त्यांना पर्याय ठेवलेला नाही. येत्या सहा महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि मुंबईसारख्या महानगरपालिकांच्या निवडणुका होत असून सर्वत्र भाजपाचे वर्चस्व राहील, हे लक्षात आल्यामुळे महाविकास आघाडीतील हजारो कार्यकर्त्यांची इकडून तिकडे धावपळ सुरू आहे, हे लक्षात घ्यायला हवे !

### नाहीतर, साडेचार वर्षे बाके बडवा..

केंद्र आणि राज्यातील निवडणूक गेल्याच वर्षी झाली असल्यामुळे केंद्रातील आणि राज्यातील भाजपा पुरस्कृत सरकारे पुढील साडेचार वर्षे तरी हलणार नाहीत. आत्ता जे विरोधी पक्षात आहेत, त्यांना या कालावधीमध्ये केवळ विरोधी बाकांवर बसून ती बडवण्याशिवाय तरुणोपाय नाही. आणि एवढा प्रदीर्घ कालावधी सत्तेबाहेर राहण्याची मानसिकता 'महाविकास आघाडी' च्या कार्यकर्त्यांची मुळीच नाही, हे पण महत्त्वाचे!

### ठाकरे बंधूंचे मनोमीलन...

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू विजयी मेळाव्याच्या निमित्ताने का होईना एकत्र आले. खरोखर ती एक चांगली गोष्ट घडली. या कार्यक्रमात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित होते. किंबहुना, त्यांना तसे आदेश होते. म्हणजे या संभाव्य गटात शरद पवार यांचा सहभाग निश्चित आहे, असे सध्या तरी म्हणायला हरकत नाही. त्यामुळे, दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याचा विषय तूर्तास बाजूला राहतो.

### मुंबई-ठाण्यात 'ठाकरे इम्पॅक्ट..'

ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या संदर्भात सध्या काही भाष्य करणे योग्य नाही, कारण अजून नवीन समीकरण स्पष्ट झालेले नाही. पण, मुंबई, ठाणे परिसरात याचा राजकीय परिणाम नक्की होऊ शकतो. तरीही एकनाथ शिंदे यांची अधिकृत शिवसेना आणि भाजपा यांच्या दिशेला जाणाऱ्या कार्यकर्त्यांना वाट मोकळी आहे. मुद्दा आहे तो फक्त भाजपाला विरोध करण्याचा! राज ठाकरे यांना एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस अधूनमधून भेटत असतातच, या उलट त्यांचे आणि उद्धव ठाकरे यांचे विळ्या-भोपळ्याचे नाते आहे. तरीसुद्धा आता भेटणार नाहीत असे नाही..अगदी उद्धव ठाकरे यांनी अट घातली तरी!

### जनतेची भोंग्यापासून सुटका..

ठाकरे बंधू एकत्र आले तरी, अजून त्यांच्या मनोमीलनाबाबत कोणालाच खात्री वाटत नाही. पण, ते गृहीत धरले तरी, पक्ष वेगवेगळे राहणार आहेत, हे वेगळे सांगायला नको! कदाचित, संजय राऊत यांच्या नाकात एखादी वेसण बांधली जाऊ शकते. म्हणजे, जनतेची सकाळच्या भोंग्यातून सुटका होऊ शकते !

### खरी गोची काँग्रेस पक्षाची..

या सर्व राजकीय परिस्थितीत खरी गोची आहे,ती महाराष्ट्र काँग्रेसची. शरद पवार गट आता ठाकरे बंधूंच्या टेकूचा आधार घेऊ शकेल. जितेंद्र आव्हाड यांचा उल्लेख 'सामना' मध्ये मुंब्रा मुलायम असा होणार नाही. उद्धव ठाकरे सतत भाजपा वर टीका करीत राहतील, टोमणे मारत राहतील. पण, असे करताना अन्य राज्यातून आलेले आणि मुंबईत कायमस्वरूपी स्थायिक झालेले मतदार कायमचे दूर जातील. हे मतदार पूर्वी काँग्रेस पक्षाकडे जात असत. ते आता भाजपा च्या दिशेने जातील हे उघड आहे. मुंबईतील मराठी माणसाचा टक्का कमी झाला आहे, आणि हिंदी माणसांचा टक्का वाढला आहे याचा फायदा उचलण्याइतपत भाजपा आणि एकनाथ शिंदे नक्कीच हुशार आहेत !

### उत्तर भारतीयांचा मोठा दबदबा..

या बदलत्या राजकारणात काँग्रेसचा उल्लेख अशासाठी केला की, यापूर्वी, मुख्यतः उत्तर भारतीय मतदारांवर काँग्रेसचे पोषण होत असे. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना कृपाशंकर सिंग हे गृहराज्यमंत्री होते. त्यांच्या हाती बरीच सत्ता एकवटलेली होती. मुंबईत मोठ्या संख्येने उत्तर भारतीय आमदार म्हणून निवडून आले तर पुढेमागे कृपाशंकर सिंग मुख्यमंत्री होतील, ही भीती त्यावेळी उघडपणे बोलून दाखवली जात होती. आता ते भाजपा मध्ये गेले आहेत, उत्तर भारतीय संजय निरुपम हे देखील एकनाथ शिंदे यांच्या बरोबर आहेत.

### शरद पवारांचे ठीक, काँग्रेसचे काय?

आगामी काळात मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात शरद पवार यांना कोणतीही अपेक्षा नसल्यामुळे त्यांनी दोघा बंधूंना पाठिंबा देऊन टाकला आहे. मुंबई ठाकरे यांच्या हाती राहावी, हाच पवार यांचा हेतू आहे. त्यांचे दोनचार नगरसेवक झाले तरी पुरे आहेत. पण, काँग्रेसचे काय ? काँग्रेसला मुंबई महानगरपालिकेत तीस जागा मिळवता येतील एवढी ताकद आहे. पण, दोन ठाकरे यांच्या मागे फरपटत जाऊन काँग्रेसला फायदा काय? हा मोठा प्रश्न आहे. त्यांची प्रचंड मोठ्या प्रमाणात फरफट होणार आहे. त्यात त्या पक्षाला सुरू असलेली गळती थोपवण्या एवढे सक्षम नेतृत्व त्यांच्याकडे नाही.

### काँग्रेसची अस्तित्वासाठी प्रचंड धडपड

शिवाय, जर महाराष्ट्रात विरोधी पक्षाची जागा ठाकरे बंधू एकत्र येऊन भरणार असतील, तर काँग्रेसला अस्तित्वाची लढाई लढणे भाग आहे. ठाकरे बंधूंच्या मेळाव्यात सुप्रिया सुळे अगदी उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. म्हणजे आता केंद्रात मंत्री वगैरे होण्याचा विषय डोक्यात नाही, असे दिसते. या प्रसंगामुळे त्या भाजपाच्या 'बॅड लिस्ट' मध्ये गेल्या आहेत, हे नक्की!

### ठाकरे बंधूंनी फिरायला हवे !

महाराष्ट्रात सगळीकडे ठाकरे बंधू एकत्र फिरले आणि स्थानिक पातळीवर कार्यकर्ते एकत्र आले तर अन्य पक्षातून देखील कार्यकर्ते तिकडे वळण्याची शक्यता आहे. अशा काळात काँग्रेस पक्षाकडे देण्यासारखे काही नसेल, तर पक्षात कोण कशाला राहील? कोणाला माहीत नसलेला प्रदेशाध्यक्ष नेमून काँग्रेसने स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे, हे त्यांच्या ज्येष्ठ नेत्यांनाही मान्य आहे.बघू या, त्यांचे नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ वगैरे मंडळी काय भूमिका घेतात ते. पण, ठाकरे बंधू सांगतील तसा प्रवास करणे, किंवा त्यांच्यामागे फरपटत जाणे, काँग्रेस पक्षाला फारसे लाभदायक ठरेल असे वाटत नाही.

### बदलत्या राजकीय समीकरणाप्रमाणे..

सध्या देशातील राजकारण प्रचंड वेगवान घडामोडींमुळे सतत बदलत आहे. पण काहीही झाले तरी स्वतःला बदलवायचे नाही, ही नेहमी आडमुठी भूमिका घेऊन काँग्रेसचा प्रवास सुरू असल्यामुळे आणि पूर्वीच्या वैभवातील सुसज्ज वाड्याची स्वप्न बघत असल्यामुळे वाड्याला दुसऱ्या बाजूने खिंडार पडले आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे दुर्दैव!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मंगलबेडा सवारीला विठ्ठलाचा तुळशीहार!

## सवारीकडून विठ्ठलालाही तुळशीहार अर्पण

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मोहरम उत्सवाला सोलापूरमध्ये स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण परंपरा लाभली आहे. अठरापगड जाती-जमातींच्या सहभागातून मोहरम उत्सव साजरा करताना सामाजिक आणि सांस्कृतिक एकोपा दिसून येतो. मोहरम आणि आषाढी एकादशी एकाच दिवशी आल्याचे औचित्य साधत पीर बडा मंगलबेडा (अहले हरम) सवारीला चौपाड विठ्ठल मंदिरातून विठ्ठलाचा प्रिय असलेला तुळशीहार तेवढ्याच सश्रध्द भावनेने अर्पण करण्यात आला.**



थोरला मंगळवेढा तालीम येथील प्रसिध्द बडा मंगलबेडा (अहले हरम) सवारीची अडीचशे वर्षांची परंपरा आहे. मूळ मंगळवेढ्यातून सोलापुरात कसबा पेठेत राजपूत समाजातील दीक्षित कुटुंबीयांच्या ताब्यात आलेल्या या सवारीची पूजाअर्चा मुजावर कुटुंबामार्फत वंश परंपरेने केली जाते. या सवारीच्या प्रथम दर्शनाचा मान विमुक्त भटक्या वडार व अन्य उपेक्षित समाजाला दिला जातो. राजपूत, मराठा, धनगर, मुस्लिम, गवळी, लोणारी, गवंडी, सुतार, पिंजारी, मोची, बुरूड, माळी, सोनार, तेली, कोष्टी, कासार आदी समाजाच्या भाविकांची मोठी श्रध्दा आहे. रविवारी सकाळी मोहरमच्या शहादत दिनी बडा मंगलबेडा सवारीची मिरवणूक हलगी, ताशा, संगीत बँडसह वाजत-गाजत निघाली. शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, ज्येष्ठ फौजदारी वकील धनंजय माने, अमर धंगेकर, अनिकेत पिसे, बिज्जू प्रधाने, सतीश प्रधाने, सुनील शेळके, धनराज दीक्षित, उज्ज्वल दीक्षित, रवींद्र दुबे, मिनाजुद्दीन काझी, विकास गायकवाड, मुदस्सर शेख आदींच्या उपस्थितीत निघालेला हा मिरवणूक सोहळा चौपाड मंदिराजवळ पोहोचला, तेव्हा आषाढी एकादशीनिमित्त आलेल्या भाविकांनी सवारीचेही दर्शन घेतले. विठ्ठलाला प्रिय मानला जाणारा तुळशीहारही मंदिरातून आणून सवारीला अर्पण केला गेला. मंदिराचे प्रमुख विश्वस्त रमेश खरात आणि मुख्य पुजारी नितीन कमलाकर कुलकर्णी यांनी ही सेवा रुजू केली. त्यानंतर सवारीच्या वतीनेही मंदिरात विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींना तुळशीहार आणि श्रीफळ अर्पण करण्यात आले. कोणताही गाजावाजा न करता ही कृती तेवढ्याच सहजपणे झाल्याचे दिसून आले. वाटेत महिला भाविकांनी जलकुंभाद्वारे सवारीचे पदप्रक्षालन केले.आसार शरीफ येथे भेटीचा विधी झाल्यानंतर सवारी पुन्हा वाजत गाजत थोरला मंगळवेढा तालीम भागात पोहोचली. कवी बदिउज्जमा बिराजदार यांनी फातेहाखानी अदा केली. मानकऱ्यांसह सर्व मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.शहरात सुमारे २५० पंजांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. गेले सहा दिवस विशिष्ट पंजांच्या मिरवणुका निघाल्या. बडे मौला अली, अकबर अली, घोडेपीर, दुर्वेश पंजे, तलवार पंजे, मुस्लिम पंजे आदी पंजांच्या मिरवणुका रितीरिवाजाप्रमाणे काढण्यात आल्या.

### भाविकांनी सवारीचेही दर्शन घेतले

थोरला मंगळवेढा तालीम येथील प्रसिध्द बडा मंगलबेडा (अहले हरम) सवारीची अडीचशे वर्षांची परंपरा आहे. मूळ मंगळवेढ्यातून सोलापुरात कसबा पेठेत राजपूत समाजातील दीक्षित कुटुंबीयांच्या ताब्यात आलेल्या या सवारीची पूजाअर्चा मुजावर कुटुंबामार्फत वंश परंपरेने केली जाते. या सवारीच्या प्रथम दर्शनाचा मान विमुक्त भटक्या वडार व अन्य उपेक्षित समाजाला दिला जातो. राजपूत, मराठा, धनगर, मुस्लिम, गवळी, लोणारी, गवंडी, सुतार, पिंजारी, मोची, बुरूड, माळी, सोनार, तेली, कोष्टी, कासार आदी समाजाच्या भाविकांची मोठी श्रध्दा आहे.रविवारी सकाळी मोहरमच्या शहादत दिनी बडा मंगलबेडा सवारीची मिरवणूक हलगी, ताशा, संगीत बँडसह वाजत-गाजत निघाली.हा मिरवणूक सोहळा चौपाड मंदिराजवळ पोहोचला, तेव्हा आषाढी एकादशीनिमित्त आलेल्या भाविकांनी सवारीचेही दर्शन घेतले.

# आषाढी एकादशीला भाविकांची विक्रमी गर्दी

## टाळ-मृदंग आणि हरिनामाच्या जयघोषाने पंढरी दुमदुमली

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**'आता कोठे धांवे मना। तुझे चरण देखिलिया।' या अभंगाची प्रचिती पंढरीत आलेल्या भाविकांना आली. आषाढी एकादशीला पंढरीत भाविकांची विक्रमी गर्दी दिसून आली. टाळ-मृदंग, हरिनामाच्या जयघोषाने पंढरी नगरी अक्षरशः दुमदुमून निघाली. एकादशीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाली. दरम्यान, विठ्ठलाच्या दर्शनाला एकादशीच्या दिवशी १६ ते १७ तास लागत होते.**



एकादशीच्या दिवशी पंढरीत सुमारे १७ ते १८ लाख भाविक दाखल झाले आहेत. येथील मठ, धर्मशाळा, भक्तनिवास, लॉज, मोकळ्या जागेत राहुट्या, तंबू टाकून भाविक विसावले आहेत. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर परिसर भाविकांनी फुलला आहे. मंदिर परिसर, नगर प्रदक्षिणा, वाळवंट आदी ठिकाणी भाविकांची गर्दी दिसून आली. एकादशीला पहाटे भाविकांनी स्नान केले. यावेळी पोलीस प्रशासनाने काही ठिकाणी एकेरी मार्ग तसेच जाणारे व स्नान करून माघारी येणाऱ्यांसाठी वेगळा मार्ग केला.

त्यामुळे गर्दी, चेंगराचेंगरी झाली नाही.एकादशीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक केली. नाशिक जिल्ह्यातील कैलास आणि कल्पना उगले या दाम्पत्याला मानाचे वारकरी म्हणून महापूजेचा मान मिळाला. श्री विठ्ठल मंदिराला एकादशीनिमित्त आकर्षक फुलांची आणि विद्युत रोषणाईने सजविण्यात आले होते. यंदा प्रशासनाने ठिकठिकाणी आरोग्य सुविधा, पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गर्दीच्या ठिकाणी 'ड्रोन'ची मदत घेऊन आवश्यक त्या उपाययोजना केल्या. तसेच शहरात २५ ठिकाणी 'वायफाय' सुविधा उपलब्ध केल्या होत्या. यंदा दर्शन रांगेत 'जर्मन हँगर'चे तीन मंडप उभारण्यात आले होते.

### माघारी येणाऱ्यांसाठी वेगळा मार्ग

एकादशी दिवशी दुपारी १२ वाजता पदस्पर्श दर्शन करण्यासाठी १६ ते १७ तास लागत होते. यंदा दर्शनरांगेत विविध सुविधा देण्यात आल्या होत्या. दरम्यान, पंढरी नगरीत जिथे पाहावे तिथे भाविकांची गर्दी, हरिनामाचा जयघोष, टाळ-मृदंग आणि भजन कीर्तनामुळे पंढरी दुमदुमून निघाली. एकादशीच्या दिवशी पंढरीत सुमारे १७ ते १८ लाख भाविक दाखल झाले आहेत. येथील मठ, धर्मशाळा, भक्तनिवास, लॉज, मोकळ्या जागेत राहुट्या, तंबू टाकून भाविक विसावले आहेत. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर परिसर भाविकांनी फुलला आहे. मंदिर परिसर, नगर प्रदक्षिणा, वाळवंट आदी ठिकाणी भाविकांची गर्दी दिसून आली. एकादशीला पहाटे भाविकांनी स्नान केले. यावेळी पोलीस प्रशासनाने काही ठिकाणी एकेरी मार्ग तसेच जाणारे व स्नान करून माघारी येणाऱ्यांसाठी वेगळा मार्ग केला. त्यामुळे गर्दी, चेंगराचेंगरी झाली नाही.

# चंद्रचूड यांना निवासस्थान सुटेना!

## चंद्रचूड निवृत्त होऊन 8 महिन्यांचा कालावधी झाला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड हे गेल्या वर्षी निवृत्त झाले आहेत. आता ते निवृत्त होऊन जवळपास ८ महिन्यांचा कालावधी झाला आहे. मात्र, अद्यापही डीवाय चंद्रचूड यांनी त्यांचं सरकारी निवासस्थान सोडलेलं नाही. ते अद्याप देखील सरकारी निवासस्थानामध्ये राहत आहेत. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने याबाबत केंद्र सरकारला पत्र लिहिलं आहे.**



### सरकारी निवासस्थान सोडावं

सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने केंद्र सरकारला लिहिलेल्या पत्रानंतर आता डीवाय चंद्रचूड यांना त्यांचं सरकारी निवासस्थान सोडावं लागणार आहे. डीवाय चंद्रचूड यांना दिलेल्या परवानगीच्या कालावधीपेक्षा जास्त काळ ते त्या निवासस्थानात राहिल्याचंही पत्रात नमूद करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.दरम्यान, १ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालय प्रशासनाकडून गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाला पत्र पाठवण्यात आलं असल्याची माहिती सांगितली जात आहे. सर्वोच्च न्यायालय प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटलं की, "आम्ही तुम्हाला विनंती करत आहोत की माननीय माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्याकडून बंगला क्रमांक ५, (कृष्णा मेनन मार्ग) ताबा अधिक विलंब न करता घेण्यात यावा.

तसेच माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी लवकरात लवकर त्यांचं सरकारी निवासस्थान सोडावं, अशी मागणी सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने केंद्र सरकारकडे केली आहे. सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने केंद्र सरकारला लिहिलेल्या पत्रानंतर आता डीवाय चंद्रचूड यांना त्यांचं सरकारी निवासस्थान सोडावं लागणार आहे. डीवाय चंद्रचूड यांना दिलेल्या परवानगीच्या कालावधीपेक्षा जास्त काळ ते त्या निवासस्थानात राहिल्याचंही पत्रात नमूद करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.दरम्यान, १ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालय प्रशासनाकडून गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाला पत्र पाठवण्यात आलं असल्याची माहिती सांगितली जात आहे. या पत्रात दिल्लीतील कृष्णा मेनन मार्गावरील बंगला क्रमांक ५ भारताच्या विद्यमान सरन्यायाधीशांचं नियुक्त निवासस्थान त्वरित रिकामे करण्याची मागणी करण्यात आली आहे.सर्वोच्च न्यायालय प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटलं की, "आम्ही तुम्हाला विनंती करत आहोत की माननीय माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्याकडून बंगला क्रमांक ५, (कृष्णा मेनन मार्ग) ताबा अधिक विलंब न करता घेण्यात यावा. कारण ३१ मे २०२५ रोजी सहा महिन्यांच्या अतिरिक्त कालावधीच्या परवानगीची मुदत संपली आहे", असं पत्रात म्हटलं आहे. दरम्यान, न्यायाधीश चंद्रचूड यांच्याशी या संदर्भात संपर्क साधला असता वैयक्तिक परिस्थितीमुळे सरकारी निवासस्थान सोडण्यासाठी विलंब झाल्याचं कारण सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे. तसेच याबाबतची पूर्णपणे माहिती सर्वोच्च न्यायालय प्रशासनाला असल्याचंही त्यांनी स्पष्ट केल्याचं वृत्तात म्हटलं आहे.सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या प्रकरणांवर ऐतिहासिक ठरतील असे निकाल दिले आहेत. मग ते प्रकरण महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचं असो, शिवसेना-राष्ट्रवादीतील फुटीचं असो, शेतकरी आंदोलनाचं असो किंवा निवडणूक रोखे प्रकरणातील निकाल असो. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी खंबीरपणे आणि तटस्थ निकाल देत न्यायव्यवस्थेवरील सामान्य जनतेचा विश्वास वाढण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यामुळे धनंजय चंद्रचूड यांचं नाव देशभरात चर्चेत आलं होतं.तसेच माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी लवकरात लवकर त्यांचं सरकारी निवासस्थान सोडावं, अशी मागणी सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने केंद्र सरकारकडे केली आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी सरकारमधून काढलं!

## आता मस्क यांना स्वत:च सरकार व्हायचंय? काढला स्वतंत्र पक्ष?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. ट्रम्प आणि मस्क हे दोघेही एकमेकांवर गंभीर आरोप आणि टीका करत असल्याचं पाहायला मिळालं आहे. खरं तर ट्रम्प यांच्या सरकारमध्ये मस्क यांची महत्वाची भूमिका राहिल्याचं मानलं जातं. एवढंच नाही तर ट्रम्प यांचे सर्वात विश्वासू म्हणून मस्क यांच्याकडे पाहिलं जात होतं. पण मागील काही दिवसांत मस्क आणि ट्रम्प यांचा वाद जगभरात चर्चेचा विषय ठरला.**



### नवीन राजकीय पक्षाची घोषणा

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील जनतेला दिलेल्या काही प्रमुख आश्वासनांच्या आधारे दुसऱ्यांदा निवडणूक जिंकली. यातील काही आश्वासने, जसे की विविध देशांमधून आयातीवर शुल्क लादणे, कार्यकारी आदेशांद्वारे अंमलात आणता येतात. या पार्श्वभूमीवरच डोनाल्ड ट्रम्प यांनी 'बिग ब्युटीफुल बिल' हे विधेयक आणलं. आता नुकतंच हे विधेयक अमेरिकन सीनेटमध्ये मंजूर देखील झालं. हे विधेयक डोनाल्ड ट्रम्प यांचं महत्त्वकांक्षी असल्याचं मानलं जातं. मात्र, याच विधेयकाला मस्क यांनी विरोध दर्शवला होता आणि ट्रम्प यांच्यावर त्यांनी टीका केली होती.एलॉन मस्क यांनी म्हटलं होतं की, "या विधेयकामुळे अमेरिकेतील लाखो नोकऱ्या जातील आणि देशाचं मोठं आर्थिक व धोरणात्मक नुकसान होईल. इतकंच नाही तर मस्क यांनी हे विधेयक पूर्णपणे वेडेपणाचं आणि विध्वंसक आहे .

डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या वादाचं मूळ कारण म्हणजे अमेरिकेत नुकतच मंजूर झालेलं 'बिग ब्युटीफुल बिल' हे विधेयक. याच विधेयकावरून ट्रम्प आणि मस्क यांच्यातील मतभेदाला सुरूवात झाली. त्यामुळे आता एलॉन मस्क यांनी आज (६ जुलै) एक मोठी घोषणा करत नवीन राजकीय पक्षाची घोषणा केली. आता मस्क हे ट्रम्प यांना थेट राजकीय मैदानात आव्हान देण्याच्या तयारीत असल्याचं बोललं जात आहे. राजकीय पक्षाची घोषणा केल्यामुळे मस्क यांना स्वत:च सरकार व्हायचंय का? असाही सवाल विचारला जात आहे. पण मस्क यांनी स्वत:चा स्वतंत्र पक्ष का काढला? याची कारणं काय आहेत? हे थोडक्यात जाणून घेऊयात.मस्क यांनी शनिवारी त्यांच्या एक्स (ट्विटर) या सोशल प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत अमेरिकेत 'अमेरिका पार्टी' नावाच्या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. तसेच काही दिवसांपूर्वी एलॉन मस्क यांनी नवीन राजकीय पक्षाची घोषणा करण्याच्या संदर्भात त्यांच्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवरून अमेरिकन लोकांचा कौल देखील घेतला होता. त्यामध्ये त्यांना लाखो लोकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यानंतर आज एलॉन मस्क यांची 'अमेरिका पार्टी' पक्षाची घोषणा केली.

# ‘लाखात एक आमचा दादा’ फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी कलाकार हे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतातच, पण अनेकदा या कलाकारांचा साधेपणाही चाहत्यांना भावतो. मराठी कलाकार हे ग्लॅमरस इंडस्ट्रीत काम करत असले; तरी अनेकदा ही कलाकार मंडळी आयुष्यात अगदी साधेपणाने जगत असतात. मालिका, चित्रपटात स्टार असणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अगदी साधेपणाने आयुष्य जगत असतात. अशाच साधेपणा जपणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे राजश्री निकम. राजश्री निकम या सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. सोशल मीडियाद्वारे ते त्यांचे अनेक फोटो व व्हिडिओ शेअर करत असतात. त्याचबरोबर कामानिमित्तची माहितीही शेअर करत असतात. अशातच त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडिओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.राजश्री यांनी शेअर केलेला हा व्हिडिओ शेतीकामाचा आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या या व्हिडिओ त्या कापणी



करतानाचे दिसत आहे. हा व्हिडिओ शेअर करत त्यांनी शेती आणि एन्जॉय असंही म्हटलं आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये त्या आनंदाने शेतीकाम करत असतानाचे पाहायला मिळत आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेला व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.अनेकांनी या व्हिडिओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर अनेकांनी अभिनेत्रीच्या साधेपणाचंही कौतुक केलं आहे. अभिनेत्री अश्विनी महांगडेनेही राजश्री यांच्या या व्हिडिओवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विनीने ‘ताई’ अशी कमेंट करत अभिनेत्रीच्या कृतीचं कौतूक केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सारिका नवाथे यांनीसुद्धा हा व्हिडिओ आवडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, राजश्री निकम या सध्या झी मराठी वाहिनीवरील ‘लाखात एक आमचा दादा’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

## दीपिका कक्करला ट्यूमर

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर दुसऱ्या टप्प्यातील यकृताच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. एका महिन्यापूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती ज्यामध्ये तिच्या यकृतातून टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला होता. अलीकडेच दीपिका पुन्हा पती शोएब इब्राहिमसह रुग्णालयात गेली होती. आता एका नवीन व्लॉगमध्ये शोएब इब्राहिमने खुलासा केला आहे की ट्यूमर शस्त्रक्रियेदरम्यान दीपिकाच्या यकृताचा काही भाग देखील कापावा लागला.नवीन व्लॉगमध्ये, दीपिका कक्कर आणि शोएब इब्राहिम त्यांचा मुलगा रुहान आणि पुतण्या हैदरसाठी खरेदी करताना दिसत आहेत. खरेदी केल्यानंतर घरी परतताना, दीपिका खूप थकलेली दिसते, ज्यावर शोएब म्हणतो “कधीकधी थकवा येतो आणि काहीही असो, शस्त्रक्रियेला फक्त एक महिना झाला आहे. यकृताचा एक भाग काढावा लागला.”शोएब इब्राहिम हाताने आकार दाखवत पुढे म्हणतो “तिच्या यकृताचा इतका भाग गेला आहे, इतका मोठा ट्यूमर आणि इतका भाग गेला आहे.”आज माझे टाके देखील काढले गेले आहेत.” मग शोएब म्हणतो “डॉक्टर म्हणत होते की कधीकधी असा दिवस येतो जेव्हा तुम्हाला काहीही करावेसे वाटत नाही.

## सोनालीचा मराठमोळा अंदाज!



मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रत्येक अपडेट सोनाली इन्स्टाग्रामवर शेअर करत असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच अभिनेत्रीने शेअर केलेला डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर नवनवीन गाणी व्हायरल होत असतात. सध्या इन्स्टाग्रामवर एका व्हायरल कवितेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ही कविता वैभव जोशी आणि अमर ओक यांच्या ऋतू बरवा कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. या कवितेच्या ओळी आहेत...या व्हायरल कवितेने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली कुलकर्णीला देखील या गाण्याची भुरळ पडली आहे. सध्या सोनाली कामानिमित्त इंग्लंड दौऱ्यावर आहे. याठिकाणी मराठमोळा लूक करून सोनालीने व्हायरल गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे.सोनाली लिहिते, “व्हायरल कवितेवर REEL व्हिडीओ बनवला नाही तर पाप लागेल...आणि ती संधी इंग्लंडमध्ये युरोपियन मराठी संमेलनच्या निमित्ताने मिळाली. अशी संधी मिळत असेल तर का बरं सोडावी?”सोनालीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खूप छान सोनाली मॅडम”, “पैठणीच्या कोणत्याही ड्रेसमध्ये ताई तू सुंदरच दिसतेस... आणि आज मराठमोळा लूक करून डान्स... कमाल”, “ट्रेंड सेटर सोनाली मॅम” अशा प्रतिक्रिया अभिनेत्रीने या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर येत्या काळात ती ‘मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी’ या सिनेमात प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. हा सिनेमा कथालेखक आणि इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई या पुस्तकावर आधारित आहे.मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री

## स्क्विड गेम 3’ च्या शेवटावर प्रेक्षकांची नाराजी

दक्षिण कोरियाची वेबसीरीज ‘स्क्विड गेम’ पहिल्या भागापासून ओटीटी विश्वात धुमाकूळ घालत आहे. २७ जून रोजी या मालिकेचा तिसरा आणि अखेरचा सीझन प्रदर्शित झाला. प्रदर्शन झाल्यानंतर या मालिकेने अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. लाखो चाहत्यांनी बिंज वॉच केल्यामुळे नेटफ्लिक्सचे ॲप काही वेळासाठी क्रॅश झाल्याची बातमीही समोर आली होती. मात्र या सीझनचा शेवट अनेक चाहत्यांना आवडलेला नाही. त्यावरून आता टीका सुरू झाली आहे. दक्षिण कोरियातही याचे पडसाद उमटले असून थेट शेअर बाजारात स्क्विड गेमशी निगडित कंपन्यांच्या समभागात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अखेर या सीरीजचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते ह्वांग डोंग-ह्युक यांनी नेटफ्लिक्स आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांना मुलाखत देऊन शेवट असा का केला? याची माहिती दिली.स्क्विड गेम वेबसीरीजमधील सर्वच पात्र हे या सीरीजचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. त्यांचे वैयक्तिक आयुष्य, त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, संकट समोर असताना त्यांच्यातील समोर आलेले खरे रुप, माणुसकी, लोभ, लालसा आणि हिंस्रपणा या भावना मालिकेत पदोपदी ठासून भरलेल्या आहेत. त्याबरोबर मालिकेत खेळले जाणारे खेळ त्यात अजून रंगत भरतात. पहिल्या सीझनपासून मध्यवर्ती भूमिका असलेले प्लेअर नंबर. ४५६ अर्थात गि-हून हे पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.अभिनेते ली जंग-जे यांनी स्क्विड गेममध्ये गि-हून हे पात्र साकारले आहे. त्यांच्या पात्राशी जगभरातील चाहते जोडले गेले असताना शेवटच्या सीझनमधील अखेरच्या भागात त्यांचा शेवट दाखविण्यात आल्यामुळे चाहते चांगलेच संतापले आहेत. पहिल्या सीझनप्रमाणे हॅप्पी एंडिंगचा कयास बांधलेल्या चाहत्यांना हा मोठा धक्काच होता. यातून दिग्दर्शक आणि निर्मात्यांवर टीका होऊ लागली. अखेर नेटफ्लिक्सला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शकांनी यावर उत्तर दिले.लेखक, दिग्दर्शक ह्वांग डोंग-ह्युक, अभिनेते ली जंग-जे आणि फ्रंट मॅनचे पात्र रंगविणाऱ्या ह्वांग इन-हो यांनी नेटफ्लिक्सवर तिसऱ्या सीझनबाबत संवाद साधला.




## मानसी १० वर्षे टेलिव्हिजनपासून का दूर होती?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जेन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याआगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती “जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन.”आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना ‘इमर्जेन्सी’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, ‘मी ‘इमर्जेन्सी’ नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. ‘इमर्जेन्सी’ हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे.

# माझा आवडता पत्रकार कुठेय?

## गिलने कसोटी विजयानंतर इंग्लिश पत्रकाराची फिरकी घेतली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय संघाने इंग्लंडविरूद्ध एजबेस्टन कसोटी सामना जिंकत इतिहास घडवला. भारतीय संघाने ५८ वर्षांत पहिल्यांदाच एजबेस्टन बर्मिंगहममध्ये कसोटी सामना जिंकला. भारत १९६७ पासून या मैदानावर खेळत आहे पण कधीही कसोटी जिंकू शकला नव्हता. त्यामुळे भारताचा रेकॉर्ड पाहता भारतासाठी हा सामना जिंकणं खूप कठीण होतं. पण शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने करून दाखवलं. इंग्लंडला ३३६ धावांनी पराभूत केल्यानंतर, गिलने एका ब्रिटिश पत्रकाराची खिल्ली उडवली, ज्याने सामन्यापूर्वी भारताच्या या मैदानावरील रेकॉर्डबद्दल टोमणे मारले होते.**



भारताने बर्मिंगहमममध्ये कधीच कसोटी सामना जिंकला नव्हता, त्यामुळे सामन्यापूर्वी त्याच अनुषंगाने कर्णधार गिलला प्रश्न विचारण्यात आले आहेत. पण सामन्यातील भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर गिलने या प्रश्नांचं व्याजासकट उत्तर दिलं. भारताच्या रेकॉर्डबद्दल प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराची गिलने आठवण काढली. पत्रकार परिषदेत गिलने त्या पत्रकाराची आठवण काढली, त्यानंतर एकच हशा पिकला. या कसोटीपूर्वी एजबॅस्टनमध्ये भारताने आठपैकी सात सामने गमावले होते.एजबॅस्टन कसोटी सुरू होण्यापूर्वी, एका ब्रिटिश पत्रकाराने शुबमन गिलला प्रश्न विचारला होता की भारत या मैदानावर कधीही जिंकला नाहीये. तेव्हा भारतीय कर्णधाराने संयमाने उत्तर देत सांगितलं की त्याला माहित नाही की यापूर्वी काय घडलं. पण सध्याचा भारतीय संघ सर्वोत्तम आहे.

आता भारताने कसोटी सामना जिंकल्यानंतरच्या पत्रकार परिषदेत बोलताना गिल एका प्रश्नाचं उत्तर देताना त्या पत्रकाराची आठवण काढली आणि म्हणाला, "माझा आवडता पत्रकार कुठे दिसत नाहीये. कुठे आहेत ते. मला खरंच त्यांना भेटायची इच्छा आहे. मी या कसोटी सामन्यापूर्वीच सांगितलं मी आकडे किंवा यापूर्वी काय घडलं यावर विश्वास ठेवत नाही. गेल्या ५०-६० वर्षांमध्ये इथे अनेक भारतीय संघ येऊन खेळले. पण यावेळचा भारतीय संघ सर्वोत्तम आहे. आमच्यात त्यांना पराभूत करण्याची क्षमता आहे. जर आम्ही योग्य वेळी योग्य निर्णय घेतले आणि असंच खेळत राहिलो तर ही मालिका कायम सर्वांच्या लक्षात राहण्यासारखी असेल."एजबॅस्टन कसोटीत भारताने इंग्लंडसमोर विजयासाठी ६०८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील संघ २७१ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून आकाश दीपने सहा विकेट्स घेतल्या. शुबमनने फलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने पहिल्या डावात द्विशतक झळकावत २६९ धावांची खेळी केली. तर दुसऱ्या डावात त्याने शतकी खेळी करत संघाच्या धावांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. .भारताने बर्मिंगहमममध्ये कधीच कसोटी सामना जिंकला नव्हता, त्यामुळे सामन्यापूर्वी त्याच अनुषंगाने कर्णधार गिलला प्रश्न विचारण्यात आले आहेत. पण सामन्यातील भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर गिलने या प्रश्नांचं व्याजासकट उत्तर दिलं.

### खरंच त्यांना भेटायची इच्छा आहे

भारताच्या रेकॉर्डबद्दल प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराची गिलने आठवण काढली. पत्रकार परिषदेत गिलने त्या पत्रकाराची आठवण काढली, त्यानंतर एकच हशा पिकला. या कसोटीपूर्वी एजबॅस्टनमध्ये भारताने आठपैकी सात सामने गमावले होते.एजबॅस्टन कसोटी सुरू होण्यापूर्वी, एका ब्रिटिश पत्रकाराने शुबमन गिलला प्रश्न विचारला होता की भारत या मैदानावर कधीही जिंकला नाहीये. तेव्हा भारतीय कर्णधाराने संयमाने उत्तर देत सांगितलं की त्याला माहित नाही की यापूर्वी काय घडलं. पण सध्याचा भारतीय संघ सर्वोत्तम आहे.आता भारताने कसोटी सामना जिंकल्यानंतरच्या पत्रकार परिषदेत बोलताना गिल एका प्रश्नाचं उत्तर देताना त्या पत्रकाराची आठवण काढली आणि म्हणाला, "माझा आवडता पत्रकार कुठे दिसत नाहीये. कुठे आहेत ते. मला खरंच त्यांना भेटायची इच्छा आहे.

# आम्ही त्याच चूका करत नाही!

## शुबमन गिलचं भारताच्या विजयानंतर मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचा नवा कसोटी कर्णधार शुबमन गिलने त्याच्या नेतृत्वात संघाला पहिला विजय मिळवून दिला आहे. पहिल्या कसोटीतील पराभवानंतर एजबेस्टन कसोटीत भारताने ऐतिहासिक विजयाची नोंद केली. टीम इंडियाने इंग्लंडचा ३३६ धावांनी मोठा पराभव केला आणि कसोटी इतिहासात इतर संघांच्या घरच्या मैदानावर धावांच्या फरकाने सर्वात मोठा विजय मिळवला. भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर संघाचा कर्णधार शुबमन गिल काय म्हणाला, पाहूया.**



शुबमन गिल भारताच्या विजयाचा हिरो ठरला आणि सामनावीराचा पुरस्कारही त्याने पटकावला. गिलने पहिल्या डावात २६९ धावा आणि दुसऱ्या डावात १६१ धावांची वादळी खेळी केली. यासह त्याने एका सामन्यात ४३० धावा करत मोठा विक्रमही नावे केला आहे. गिल कसोटी सामन्यात ४०० पेक्षा जास्त धावा करणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला. कसोटी सामन्यात द्विशतक आणि शतक करणारा तो दुसरा भारतीय आणि एकूण नववा फलंदाज ठरला. तर शुबमन गिलशिवाय गोलंदाजीत आकाशदीप आणि मोहम्मद सिराज यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. आकाशदीपने सामन्यात एकूण १० तर सिराजने ७ विकेट्स घेतले.शुबमन गिलने भारताच्या गोलंदाजी आणि फिल्डिंगचं कौतुक केलं आणि दोन्ही विभागात संघाने चांगली कामगिरी केल्याचं म्हटलं.

### गोलंदाजांबद्दल काय म्हणाला शुबमन

त्या दोघांनीही आणि प्रसिधने चांगली गोलंदाजी केली. प्रसिधला सिराज-आकाशदीपइतके विकेट्स मिळाले नाही, पण त्याने गोलंदाजी उत्तम केली."आकाशदीपच्या गोलंदाजीबद्दल शुबमन म्हणाला, "आकाशदीपने खूप मनापासून गोलंदाजी केली. त्याने योग्य लाईन आणि लेंथवर गोलंदाजी केली.

भारताने पहिल्या कसोटीत अनेक झेल सोडले होते. गिल विजयानंतर म्हणाला, "गेल्या सामन्यानंतर आम्ही ज्या मुद्द्यांवर चर्चा केली होती, त्या सर्वच गोष्टींमध्ये या सामन्यात आम्ही चांगली कामगिरी केली. आम्ही गोलंदाजी आणि फिल्डिंग विभागात आश्चर्यकारक कामगिरी केली. अशा प्रकारच्या खेळपट्टीवर, जर आम्ही ४००-५०० धावा करू शकलो तर ते पुरेसं असेल, याची आम्हाला कल्पना होती. आम्ही हेडिंग्लेमध्ये जितके झेल सोडले तीच चूक आम्ही प्रत्येक वेळेस करणार नाही आहोत."गोलंदाजीबद्दल कर्णधार म्हणाला, "आमच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली. ज्याप्रकारे त्यांनी इंग्लंडच्या वरच्या फळीला बाद केलं, ते आमच्यासाठी खूप महत्त्वाचं होतं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। सोमवार।
। दि. 7 जुलै 2025।

## शिक्षक, विद्यार्थ्यांनी जोपासली वारकरी संप्रदायाची परंपरा

# "विठ्ठल विठ्ठल" नामघोषात विद्यार्थी झाले दंग!

## शिक्षण विश्व: आषाढी एकादशी निमित्त संत साई शाळेत उत्सव साजरा

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भोसरी येथील संत साई हायस्कूल येथे आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन वारकरी संप्रदायाची परंपरा जोपासत भक्तिभावाने हा उत्सव साजरा केला.**





कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, विठ्ठल रखुमाई पूजन व पालखी, ग्रंथ पूजनाने झाली. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध संतांची वेशभूषा परिधान करून पालखी सोहळा, फुगडी, भजन, अभंगगायन यांसारख्या उपक्रमांमध्ये भाग घेतला. "माऊली माऊली" च्या गजरात शाळेचा परिसर भक्तिमय झाला.

ह. भ. प. मीराताई काटमोरे व सहकारी यांनी सादर केलेले भक्तीगीत व भारुडचा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरले..या वेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "वारकरी परंपरा ही आपली संस्कृती, भक्ती आणि एकतेचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांनी या परंपरेतून भक्ती, शिस्त आणि समाजभावना शिकाव्यात." या कार्यक्रमाला शाळेच्या उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम, मनोज वाबळे, संजय अनार्थे, मंजुषा वाळवेकर, मालन लिगाडे, अक्षय राणे, स्वाती मोघे, रिया पोतदार, शुभांगी काटे, संगीता शिंदे यांचेही सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवी मधील विद्यार्थिनी सायली गायकवाड व श्रीशा लोंढे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षिका श्वेता नारायणगावकर यांनी केले. इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी पूर्वी जावळगी हिने वारीचे सुंदर असे वर्णन केले.

कार्यक्रमाला उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते भगवान पठारे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता ढवळेश्वर, संस्थेच्या डायरेक्टर पायल ढवळेश्वर, भारती ढवळेश्वर,सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी, विध्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like ‘Read-to-Lead’
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE


# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open:** AY 2025 – 26*
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open:** AY 2025 – 26*
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK · wipro · NTT DATA · virtusa · B&R · Emcure · KNORR-BREMSE · NuLife · CitiusTech · SHL · McKinley Rice · bvg · Technoniq · RPG · CONSTROLOGIX · NASSCOM FOUNDATION · INDOVANCE · Tech Mahindra · DataTech Labs · EMERSON · newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**